म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा-वा.
दा. क्र. 8400



# कबुतरे

कबुतरे ही दाणे टिपती
मला पाहता पळून जाती

उंच घराच्या कौलांवरती
शिवाशिवीचा खेळ खेळती

कधी घराच्या आडोशाला
यांची भरते गायनशाळा

पंख मिटुनि, लक्ष देऊनि
शिकती गाणी हूंऽहूं करूनी

BVBK-0400470



# ढगा ढगा

ढगा ढगा रूसू नको
वाऱ्यासंगे भांडू नको

वारा तुला झुलवील
दूर पळून जाईल

मग बिजली येईल
दोन रट्टे देईल

रट्टे बसतील सप्पासप
पडेल पाऊस पटापट



# कावळ्याचें फराळाचें दुकान



एका कावळ्याने
उघडून दुकान
फलक लावला
चहा घ्या छान

पहाट होताच
चिमुकली चिमणी
मागू लागली
चहा अन् पाणी





BVBK-0400470

शीळ घालीत
पोपटराव आले
एक लाडू लाव
ऐटीत म्हणाले



नाचत आले मोरोबा मोरे
कावळ्याला म्हणाले, " कोका कोला दे रे "



गोड गळ्याची
कोकिळा आली
पियुष दे रे ऽ
हळूच म्हणाली
कावळा म्हणाला ऐकून सारे
सर्वांनी पैसे आणलेत का रे
पैशाचे नाव येताच कानी
सारेजण गेले पळूनि रानी





# कावळ्याचे लग्न

कावळ्याचे लग्न आहे
चला चला भर भर

लग्नमंडप बांधला आहे
नदीच्या काठावर !

काळे डगले घालून आले
वाजंत्री कावळे

अंतरपाठ धरतील आता
सोवळे नेसून बगळे !

कावळ्याच्या लग्नामध्ये
चिऊताई करवली
'ऐका ऐका–कोकिळेने
मंगलाष्टके आळविली'

बांधावर उभे राहून
बेडूक म्हणे 'सावधान!'
लग्नाच्या घाईमध्ये
कोणालाच नव्हते भान!

आकाशातून आल्या तेव्हा
सर सर सरी
कावळ्याचे लगीन झाले
चला आता घरी!





# दवाखाना

जंगलामध्ये झाडाखाली
माकड उघडी दवाखाना

फलक लावला " माफक दर
खुला आहे सर्वांना ! "

पाठीवरचे टेंगुळ सावरीत
उंट आला आत

माकड म्हणे तपासण्याचे
पैसे पडतील सात

वाघ सांगे उन्हामध्ये
उघडत नाही माझा डोळा

माकड म्हणे " एवढेच ना—
दिवसा वापरा चष्मा काळा "

भीत भीत ससा सांगे
मला भरते रोज कापरे

विचार करूनि माकड वदे
त्याला नाही औषध दुसरे

हत्ती म्हणे "शरीर लठ्ठ
मग शेपूट छोटे कसे ?"

माकड म्हणे, दोर आणा
करून देतो पाहिजे तसे



# पोपट अमुचा छान



पोपट अमुचा छान। खरोखर, पोपट अमुचा
छान ॥ ध्रृ० ॥

हिरवे नाजुक पंख शोभती
सुंदर पट्टा मानेभोवती
इवले डोळे लुकलुक करिती

चोच दिसे किती छान। खरोखर, चोच दिसे
किती छान ॥ १ ॥

मजेत खातो डाळ चण्याची
पेरू आणिक हिरवी मिरची
आवड याला डाळिंबाची
पहा डोलवी मान। चिमुकली, पहा डोलवी मान ।।२।।

शीळ घालुनि गातो गाणी
"या या" म्हणतो दिसता कोणी
दावि वाकुल्या पिंजऱ्यामधुनि
उड्या मारितो छान । पहा रे, उड्या मारितो छान ।।३।।






पावसा पावसा येशील का ?

माझे मडके भरशील का ?

मडके माझे फुटके

पाऊस उगाच भटके

पाऊस भटक भटक भटकला

नदीत जाऊन बुडाला

# बेडूकराव



बेडूक एकदा शाळेत गेला
गंपूच्या शेजारी गुपचूप बसला

बघितले गंपूने बावळट ध्यान
खिशात टाकले पकडून कान

बेडूक ओरडला डरॉंव डरॉंव
चिंतूने सांगितले गंपूचे नाव

धावले मास्तर घेऊन छडी
बेडकाने मारली टुणकन् उडी

घाबरले मास्तर बेडूक पळाला
गंपूला छडी प्रसाद मिळाला !

# मनुताई

मनुताई ऐक गडे
आळस कधीं करू नये
बाळ दुध पिताना
टक लावून पाहू नये.

मनुताई ऐक गडे
मोत्यासंगे भांडू नये
बाळ खेळ खेळताना
भीती त्याला दावू नये.

मनुताई ऐक गडे
चोरी कधी करू नये
चोरलेले दूध-तूप
उपवासाला खाऊ नये.




आकाशातील निळी हवेली
तेथे राहते ताई बिजली

बिजलीताई रागीट फार
ढगोबाला देई मार

ढग ओरडे–गड् गड् गडाट
वारा पळे सूं सूं सूंसाट

पळता पळता थांबे वारा
ढगोबांनी फेकल्या गारा

गारा पडल्या टपाटप
करा गोळा चटाचट !



एक होता तात्या
आणि एक मोत्या
तात्या होता खादाड
मोत्या होता लबाड

तात्याने केले लाडू
मोत्या म्हणतो "कडू"
तात्याने आणले केळे
मोत्या म्हणतो "शिळे"

तात्याने केले वडे
मोत्या म्हणतो जाडे
तात्याने घेतली छडी
मोत्या मारतो उडी !




देवा तुझे जग । सुंदर सुंदर
कलाकार थोर । तूचि देवा
झाडाफुलांसवे । शोभतात वने
हरित ती राने । मनोहर
नद्या नाले ओढे । झुळू झुळू गाती
वाहुनिया नेति । शुभ्र पाणी
ऊंच ऊंच गिरी । खोल किती दरी
शुभ्र हिमगिरी । उभे इथे
निळे निळे नभ । बहुरूपी मेघ
उंच जाती खग । चिमुकले
चंद्र सूर्य देति । आम्हांला प्रकाश
वाराही उल्हास । देई सर्वां
देवा तुझे जग । सुंदर सुंदर
आवडते फार । सर्वांनाही.



# अशी खोड मोडली

एक होती माऊ
तिला पाहिजे होता खाऊ

मनात म्हणते कशी
स्वयंपाक-घरात जाऊ !

म्यॉंव म्यॉंव करीत
इकडे तिकडे बघीत

माऊ चालली शोधीत
खाऊसाठी पळत

स्वयंपाक घरात आली
तेथे होती थाळी

थाळीत होती खीर
माऊ झाली अधीर

मागे पुढे बघून
माऊ गेली धावून

हळूच घातले तोंड
जिभेला आले फोड

खीर होती गरम
माऊ झाली नरम

म. फुं. सं. डांगे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ८५० दिनांक ......
विषय बा. वा. क्र. ..........




नाही कुणा नमणार, आम्ही शत्रूशी लढणार

इतिहास आमुचा वीरत्वाचा

देशभक्ति अन् अभिमानाचा

दिव्य वारसा परंपरेचा

स्फूर्ति आम्हा देणार, आम्ही शत्रूशी लढणार



BVBK-0400470